*(रुग्णालयीन स्तरावर प्रसिध्द करावयाचा जाहिरातीचा नमुना )*

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## <u>जाहिरात</u>

**पं. मदन मोहन मालविय शताब्दी रुग्णालय, वा.तु. पाटील मार्ग रुग्णालयांच्या आस्थापनेवर** ई.सी.जी. टेक्निशियन **संवर्गातील कंत्राटी तत्वावरील पद भरती .**

**एचओ /5413/ सीएचजी दि.28.10.2025**

## WALK IN INTERVIEW

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) यांच्या अखत्यारित असलेल्या १६ उपनगरीय रुग्णालयांपैकी **पं. मदन मोहन मालविय शताब्दी रुग्णालय, वा.तु. पाटील मार्ग रुग्णालयांच्या आस्थापनेवर** रुग्णालयाच्या आस्थापनेवरील ई.सी.जी. टेक्निशियन संवर्गातील पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्त्वावर ०६ महिन्यांच्या कालावधीकरीता (प्रत्येक ४५ दिवसानंतर खंड देऊन) ठोक मानधनावर भरावयाची आहेत. त्यासाठीची निवड यादी बनविण्याकरिता सदर पदांच्या नमूद केलेल्या अर्हता व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज शुल्क रु. ७१०/- + १८ % जीएसटी १२८/- = रु. ८३८/- इतके भरुन अर्ज वितरीत करण्यात येतील .

दि.२७.१०.२०२५ पासून दि.१५.११.२०२५ पर्यंत सदर अर्जांची विक्री प्रमुख वैद्यकीय अधिकारी (प्र), पंडित मदन मोहन मालविय शताब्दी रुग्णालय, वामन तुकाराम मार्ग, गोवंडी (पू), मुंबई – ४०० ०८८. येथे करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | पदसंख्या | दरमहा ठोस वेतन (रु.) |
|---|---|---|---|
| १ | ई.सी.जी. टेक्निशियन (ई.सी.जी. तंत्रज्ञ) | १ | रु.१८,०००/- |

**अ) अर्हताः**

**१. ई.सी.जी. टेक्निशियनः**

१. उमेदवार १२वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा कार्डियो-टेक्नॉलॉजी (Cardio-Technology) विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor in Paramedical Technology in Cardio-Technology) ३ १/२ वर्षाचा पूर्णवेळ अभ्यासक्रम उत्तीर्ण असावा किंवा,

२. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाची विज्ञान शाखेची पदार्थ विज्ञान (B.Sc. in Physics) पदवी परीक्षा उत्तीर्ण असावा व त्यास ई.सी.जी.मधील कामाचा किमान ६ महिन्यांचा अनुभव असावा.

३. उमेदवारास खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

४. उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर, स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा.

५. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

- उपरोक्त निकषांनुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

**ब) सर्वसाधारण अटी व शर्ती:-**

(१) रुग्णालयाच्या आस्थापनेवर असलेल्या रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार कंत्राटी उमेदवारांची नेमणूक करण्यात येईल. तथापी कंत्राटी उमेदवारांना महापालिकेतील नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.

(२) जाहिरातीमध्ये दिलेली पदांची संख्या आवश्यकतेनुसार कमी करण्यात येईल.

(३) अर्ज स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने पूर्ण असावेत. अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

(४) अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या दोन अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराने जवळ बाळगाव्यात.

(५) उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता कंत्राटी तत्वावरील नियुक्ती रद्द करण्यात येईल.

(६) पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.

(७) उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

(८) उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे / व्यावसायिक अर्हता / संबंधित गुणपत्रिका / अनुभवाचे प्रमाणपत्र / नेमणूक पत्र यांच्या मूळ प्रती व स्वसाक्षांकित छायांकित प्रतींसह पडताळणीसाठी उपस्थित रहावे.

(९) प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार मूळ कागदपत्रांच्या पडताळणीचा दिनांक, वेळ व ठिकाण उमेदवारांना भ्रमध्णध्वनी / ई-मेलव्दारे कळविण्यात येईल.

(१०) उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी आणि पडताळणीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

(११) निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित पदावर कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यापूर्वी त्यांना रु.५००/- किंमतीच्या स्टँपपेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

(१२) कंत्राटी तत्वावर नियुक्त उमेदवारांना निवासस्थानाची व्यवस्था केली जाणार नाही.

(१३) कंत्राटी उमेदवारांची आवश्यकतेनुसार १६ उपनगरीय रुग्णालयात नेमणूक / बदली करण्यात येईल.

(१४) उमेदवारांची नेमणूक पूर्णत: कंत्राटी पध्दतीने प्रत्येक ४५ दिवसांनंतर १ दिवस सेवाखंड देऊन एकावेळी एका महिन्यांच्या कालावधीकरीता करण्यात येईल. नियमित तत्वावर भरतीव्दारे उमेदवार प्राप्त झाल्यास सदरहू कंत्राटी उमेदवाराची नियुक्ती तात्काळ प्रभावाने संपुष्टात येईल.

(१५) सदर नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्याने त्यांना महापालिकेच्या नियमित सेवेमध्ये संबंधित पदावर कायमस्वरुपी नियुक्तीसाठी हक्क किंवा प्राधान्य मागता येणार नाही.

**ड) विशेष सूचनाः-**

१. यापूर्वी संबंधित कार्यालयात किंवा अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले / टपालाव्दारे सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२. बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज लिहिणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

३. जर एखाद्या उमेदवाराने कंत्राटी भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

४. मध्यस्थ / ठग / मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती, यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याचे आश्वासनापासून उमेदवारांनी सावध रहावे.

५. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मान. आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

-sd/-

**प्रमुख वैद्यकीय अधिकारी**
**पं.मदनमोहन मालवीय,**
**शताब्दी रुग्णालय,गोंवडी**
**मुंबई-४०००८८.**

-sd-

**वै.अ. / प्रवैअ .....रुग्णालय**

**पदांच्या अर्हता खालील लिंक वर उपलब्ध आहेत.**

https://drive.google.com/drive/folders/1C80BijgkPd2RTDC7fhpx8n1vzXPi0FHs?usp=sharing

1. **लिपिक**

**1)** (i) उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण असावा.

आणि

(ii)उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वाणिज्य,विज्ञान,कला,विधी किंवा तत्सम शाखांचा पदवीधर असावा आणि प्रथम प्रयत्नात किमान 45% गुणांसह उत्तीर्ण असावा.

किंवा

(iii)ज्या मान्यताप्राप्त विद्यापिठामध्ये सत्र पद्धत अवलंबिली जात असेल त्या विद्यापिठातील उमेदवाराची टक्केवारी खालीलप्रमाणे गणण्यात येऊन, सदर टक्केवारी 45% गुणांसह प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

1. 7 Point Grading System (CB GS) प्रमाणे श्रेणी देण्यात येणा-या विद्यापिठातील उमेदवाराच्या सर्व विषयांच्या गुणांची एकत्रित टक्केवारी गणण्यात येईल.

2. तसेच, 10 Point Grading System (CB CS) प्रमाणे श्रेणी देण्यात येणा-या विद्यापिठातील उमेदवाराची टक्केवारी पुढील सुत्राप्रमाणे गणण्यात येईल.

टक्केवारी (%) = 7.1 X CGPA (Cumulative Grade Point Average ) + 11.

टक्केवारीची गणना वरील सूत्र वापरून अपूर्णांकात आल्यास पुढील पूर्णांकात गणण्यात येईल.

**2)** उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांचे मराठी व 100 गुणांचे इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

**3)** उमेदवाराकडे शासनाची इंग्रजी व मराठी टंकलेखनाची प्रत्येकी किमान 30 शब्द प्रति मिनिट वेगाची परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र असावे.

**4)** (I) उमेदवाराजवळ'एम.एस.सी.आय.टी' परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा शासन निर्णय क्र.मातंस/ 2012/प्र.क्र.277/39 दि.04.02.2013 आणि शासन पुरकपत्र क्र.मातंस/ 2012/प्र.क्र.277/39 दि.08.01.2018 तसेच, शासन पुरकपत्र क्र.मातंस/ 2012/प्र.क्र.277/39 दि.16.07.2018 मध्ये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचानलयाने यासंदर्भात यापुढे वेळोवेळी निर्गमित केलेल्या व बृहन्मुंबई महानगरपालिकेने अंमलात आणलेल्या परिपत्रकातील तरतुदी लागू होतील.

(II) उमेदवाराला संगणकातील ऑपरेटिंग सिस्टीम, वर्ड प्रोसेसिंग, स्प्रेडशिट, प्रेझेंटेशन, डेटाबेस सॉफ्टवेअर, ई-मेल आणि इंटरनेट इत्यादीविषयी उत्तम ज्ञान असावे.

2. **कनिष्ठ गंथपाल**

१. उमेदवार कला / वाणिज्य/ विज्ञान शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधारक असावा तसेच उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठाची ग्रंथालय विज्ञान विषयातील पदवी (B.Lib)/(B.L.L.S) धारण करणे अनिवार्य आहे.

२. ग्रंथालयातील कामाचा अनुभव असणा-यास प्राधान्य दिले जाईल.

३. इंग्रजी व मराठी टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण आवश्यक

४. उमेदवार १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेली मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इतत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर / निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. उमेदवार 'डि.ओ.ई.ए.सी.सोसायटीचे"'सी.सी.सी." किंवा 'ओ स्तर " किंवा 'ए स्तर" किंवा 'बी स्तर" किंवा 'सी स्तर" स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण मंडळाचे एमएससीआयटी किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी /वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

3. <u>समाज विकास अधिकारी</u>

१. उमेदवार शासन मान्यताप्राप्त विद्यापिठाचा समाज कार्यातील (Master of Social Work किंवा Master of Arts in Social Work) विषयात पूर्णवेळ पदव्युत्तर पदवीकाधारक असावा.

२. उमेदवारास शासकीय / निमशासकीय / महामंडळे / मंडळे / स्थानिक स्वराज्य संस्था किंवा अशासकीय संस्थांमधील सामाजिक कार्याशी संबंधित योजनांमध्ये किमान ०१ वर्षाचा सेवेचा अनुभव असावा.

३. उमेदवार १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेली मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इतत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर / निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

४. उमेदवार 'डि.ओ.ई.ए.सी.सोसायटीचे"'सी.सी.सी." किंवा 'ओ स्तर " किंवा 'ए स्तर" किंवा 'बी स्तर" किंवा 'सी स्तर" स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण मंडळाचे एमएससीआयटी किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी /वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

4. प्रयोगशाळा तंत्रज्ञ

(2.1) (अ) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील (Degree in B.Sc.)पदवी धारण करणारा असावा. आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची M. S. B. T. ची डी.एम.एल.टी **(D.M.L.T.)** पदविका उत्तीर्ण असावा (B.Sc. + D.M.L.T.)

5. किंवा

(ब) उमेदवाराने 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठ यांचेकडील निम्न वैद्यकिय तंत्रज्ञान या शाखेतील लॅबोरेटरी मेडीसीन या विषयातील (Bachelor of Paramedical Technology in Laboratory Medicine)पदवी धारण करणारा असावा

(2.2) उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा वा तत्सम परीक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

6.

(2.3) उमदेवारांना संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक आहे. त्याने/तिने "डी.ओ.ई.ए.सी.सी.सोसायटीचे" "सी.सी.सी." किंवा "ओ स्तर " किंवा "ए स्तर" किंवा "बी स्तर" किंवा "सी स्तर" स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण मंडळाचे एमएससीआयटी किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे

5. औषधनिर्माता

(1) उमेदवाराकडे राज्य शासनाच्या तंत्रशिक्षण मंडळाची फामर्सीमधील पदविका किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची फार्मासीमधील पदवी असणे आवश्यक आहे. (पदवीस प्राधान्य देण्यात येईल.)

(2) उमेदवार महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलकडे नोंदणीकृत असावा.

(3) संगणक विषयक अर्हता उमेदवार डीओईएसीसी सोसायटीचे 'सी.सी.सी.' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर ' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा. तथापी, उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने /तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी .ची परीक्षा नेमणुकीच्या दिनांकापासून 02 वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे .अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

(4) उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा वा तत्सम परीक्षा किमान ५० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

*(रुग्णालयीन स्तरावर प्रसिध्द करावयाचा जाहिरातीचा नमुना )*

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिरात

**पंडित मदन मोहन मालविय शताब्दी रुग्णालय, गोवंडी या रुग्णालयांच्या आस्थापनेवर विविध संवर्गातील कंत्राटी तत्वावरील पद भरती (वाढीव मुदत )**

एचओ / ७०५ / सीएचजी दि. २३.०४.२०२५

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) यांच्या अखत्यारित असलेल्या १६ उपनगरीय रुग्णालयांपैकी पंडित मदन मोहन मालविय शताब्दी रुग्णालय, गोवंडी या रुग्णालयाच्या आस्थापनेवरील खाली नमूद करण्यात आलेली विविध संवर्गातील पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर ०६ महिन्यांच्या कालावधीकरीता (प्रत्येक ४५

दिवसानंतर खंड देऊन) ठोक मानधनावर भरावयाची आहेत. त्यासाठीची निवड यादी बनविण्याकरिता सदर पदांच्या नमूद केलेल्या अर्हता व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज शुल्क रु. ७१०/- + १८ % जीएसटी १२८/- = रु. ८३८/- इतके भरुन अर्ज वितरीत करण्यात येतील .

सदर अर्जांची विक्री व स्विकृती तारिख दि.१५.०४.२०२५ ते दि.२२.०४.२०२५ पर्यंत (कार्यालयीन वेळेत) पर्यंत होती. परंतु रिक्त जागांच्या प्रमाणात अर्ज विहित कालावधीत आले नसल्याने व रुग्णालयीन कामकाजासाठी रिक्त जागा भरणे आवश्यक असल्याने दि.२३.०४.२०२५ ते दि.२५.०४.२०२५ पर्यंत (कार्यालयीन वेळेत) संध्या. ४.०० वाजेपर्यंत अर्जांची विक्री व स्विकृतीस वाढीव मुदत देण्यात येत आहे. तरी प्रमुख वैद्यकीय अधिकारी (प्र), पंडित मदन मोहन मालविय शताब्दी रुग्णालय, वामन तुकाराम मार्ग, गोवंडी (पू), मुंबई – ४०० ०८८. येथे करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | पदसंख्या | दरमहा ठोस वेतन (रु.) |
|---|---|---|---|
| १ | ई.सी.जी. टेक्निशियन (ई.सी.जी. तंत्रज्ञ) | १ | रु.१८,०००/- |
| २ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (लॅब टेक्निशियन) | १ | रु.२०,०००/- |
| ३ | फार्मासिस्ट (औषध निर्माता) | १ | रु.२०,०००/- |
| ४ | स्टाफ नर्स (परिचारिका) | ८ | रु.३०,०००/- |

याआधी दिलेल्या जाहिरातीमधील अर्हता व इतर बाबी समान राहतील.

प्रमुख वैद्यकीय अधिकारी (प्र)
पं.मदन मोहन मालविय शताब्दी रुग्णालय, गोवंडी

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सांकेतिक स्थळावर जाहिरात देण्याबाबत.